## ४,७४८ वाहन चालकांवर कारवाई

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्र दारूबंदी तसेच एनडीपीएस कायद्यान्वये एकूण ८ प्रकरणांत ९ जणांकडून ८७ हजार ०३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायद्यान्वये २ प्रकरणांत ९ जणांकडून ११ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली ४ हजार ७४८ वाहन चालकांवर कारवाई केली. त्यांच्याकडून १ लाख २४ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. नागपूर शहर पोलिसांनी वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या राबविली.

गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# नागपूर

नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/९

## बेशुद्ध अवस्थेत सापडलेल्या इसमाचा मृत्यू

**लोकशाही वार्ता/नागपूर**

नंदनवन पोलिस ठाणे हद्दीत बेशुद्ध अवस्थेत सापडलेल्या अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाला. माहितीनुसार, सोमवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास दिघोरी रोड, रामविलास कॉम्प्लेक्स दुकान नंबर २, शटरच्या पायरीजवळ एक अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वयाचे बेशुद्ध अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरिता मेडिकल रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सूचनेवरून नंदनवन पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद घेतली आहे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## दृष्टिक्षेप

### रसायनाच्या टँकमध्ये पडून कामगाराचा मृत्यू

**नागपूर :** कन्हानमधील टेकाडी कोळसा खानीच्या परिसरात असलेल्या प्री-रिक्सन ड्रावल तार कंपनीमध्ये कार्यरत एक कामगार कंपनीतील रसायनाच्या टाक्यात पडल्याने त्याचा मृत्यू झाला ११ जानेवारीला दुपारी तीन वाजता घडली. या प्रकरणी कामगाराच्या नातेवाईकांनी बजाजनगर पोलिस ठाण्यात कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध तक्रार दिली. मानव केवलराम भालेकर असे मृत कामगाराचे नाव आहे. कंपनीत मानव भालेकर हा कामगार होता. ११ जानेवारीला तो कंपनीत काम करीत होता. यावेळी तो अचानक रसायनाच्या टाक्यात पडल्याने त्याच्या नाका-तोंडात रसायन गेले. अशातच तो बेशुद्ध पडला. त्याला नागपुरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान रविवारी रात्री त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात भालेकर याच्या नातेवाईकांनी कंपनी व्यवस्थापनाच्या विरुद्ध तक्रार केली आहे.

### टाटा ट्रेलरच्या धडकेत पादचारी महिला ठार

**नागपूर :** रस्त्याने पायदळ जात असलेल्या वृद्ध महिलेला भरधाव टाटा ट्रेलरच्या चालकाने धडक दिली. या अपघातात या महिलेचा मृत्यू झाला. वाठोडा ठाणे हद्दीत हा अपघात घडला. सुमन गंगाधर ठाकरे (७३, रा. प्लॉट नंबर ४४, गजाननगर, वाठोडा) असे या महिलेचे नाव आहे. माहितीनुसार, सुमन ठाकरे या सोमवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास वाठोडा चौक, सुलभ शौचालयासमोरून पायदळ जात होत्या. यावेळी, टाटा ट्रेलर (एमएच ३४ बीझेड ६७३१) च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत त्यांना धडक दिली. अपघातानंतर आरोपी हा वाहनासह पळून गेला. अपघातात सुमन ठाकरे या गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरिता लोकांनी मेडिकल रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी मोहन मारोती ठाकरे (६३, रा. प्लॉट नंबर ६७४, जानकीनगर, कळमना) यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाठोडा ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल राऊत यांनी आरोपीविरुद्ध कलम १०६(१), २८१ भान्यासं, सहकलम १३४(अ) (ब), १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### 'एमडी'सह विक्रेत्याला अटक

**नागपूर :** शहरात दुचाकीवरून एमडी पावडर विक्री करणाऱ्याला अजनी पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्रशांत विश्राम चुटे (३४, रा. प्लॉट नंबर ७२, रामबाग, इमामवाडा) असे या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, शनिवारी पोलिसांच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून त्यांनी रात्री ८.५५ वाजताच्या सुमारास मेडिकल रुग्णालयाजवळील नेत्र विभागाच्या रस्त्यावर छापा टाकला. येथे आरोपी प्रशांत चुटे हा (एमएच ४९ एस ५८७७) दुचाकीवर दिसला. त्याला ताब्यात घेत पोलिसांनी वाहनाची झडती घेतली. यावेळी त्यांना एका झिपलॉक पाकिटात ४.२३ ग्रॅम एमडी पावडर सापडले. कारवाईत पोलिसांनी एमडी पावडरसह दुचाकी असा एकूण ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपीविरुद्ध कलम ८ (क), २२ (ब) एन. डी. पी. एस. कायद्यान्वये गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली आहे.


# अल्पवयीन मुलाकडून वडिलांची हत्या

## टॉवेलने गळा आवळला : मृतदेह नदीत फेकण्याचा कट, आईनेही दिली साथ

**लोकशाही वार्ता/नागपूर**

दहाव्या वर्गाचे शिक्षण घेणाऱ्या मुलाने त्याच्या आईच्या मदतीने वडिलांचा गळा आवळत त्यांची हत्या केली. हुडकेश्वर ठाणे हद्दीत ही घटना घडली असून, या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मायलेकांवर हत्येचा गुन्हा दखल करीत दोघांनाही ताब्यात घेतले आहे. मुकेश (५७) असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुकेश एका हार्डवेअरच्या दुकानात साहित्य विक्रीसाठी कामावर होता. त्याला पत्नी निर्मला व दोन मुले आहेत. १९ वर्षांचा मोठा मुलगा हा पुण्यात एका कंपनीत नोकरी करतो. तर लहान




मुलगा विधिसंघर्षबालक हा दहावीत शिकतो. पत्नी निर्मला ही हाती आले ती कामे करते. अर्थातच घरची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. म्हणूनही मोठ्या मुलाला मध्येच शिक्षण सोडावे लागले आणि पुण्यात कमाईसाठी जावे लागले. त्याचा लहान भाऊ हा अभ्यासात हुशार आहे. तोदेखील सुटीच्या दिवशी कामाला जातो. शिवाय उन्हाळ्याच्या सुटीत तो दुकानामध्ये काम करीत होता. वडील मुकेशला

> **आरोपी अल्पवयीन मुलगा हा दहावीत शिकतो. तो अभ्यासात चांगला असला तरी घरची परिस्थिती बेताचीच असल्याने तो सुटीच्या दिवशी कामावर जायचा. उन्हाळ्याच्या सुटीतदेखील तो दुकानांमध्ये काम करून घरखर्चात मदत करीत होता. वडील दारूच्या व्यसनापोटी घराकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे पाहून तो नेहमी चिडायचा. हत्येनंतर मायलेकाने मुकेशचा मृतदेह पांढऱ्या रंगाच्या पोत्यात भरला व तो दोन्ही बाजूंनी शिवला. मृतदेह नदी किंवा नाल्यात फेकण्याचे ठरविले होते.**

दारूचे व्यसन होते. गेल्या काही महिन्यांपासून त्याचे दारूचे व्यसन खूप वाढले. दारू पिण्यासाठी घरातील वस्तू-सामान विकून तो दारू पीत होता. दारू ढोसल्यानंतर तो नशेत दोघेही मायलेकाला शिवीगाळ व मारहाण करायचा. त्याच्या या त्रासाला पत्नी व मुलगा कंटाळले होते. रविवारी रात्री ११ वाजता मुकेश दारू पिऊन घरी आला. त्याने पत्नीला शिवीगाळ आणि मारहाण केली. मुलगा बंटी दोघांचा वाद सोडविण्यासाठी गेला. त्यालाही वडिलांनी मारहाण केली. पोटात लात मारल्यामुळे आई तडफडत असताना मुलाचा राग अनावर झाल्यानंतर त्याने थेट टॉवेलने त्याच्या वडिलांचा गळा आवळला. काही मिनिटातच मुकेशचा मृत्यू झाला.

मुलाच्या रागाच्या भरात झालेल्या पतीच्या हत्येनंतर पत्नीने मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला. मृतदेह नदीत फेकण्याचे नियोजन केले. त्यासाठी मुलाने त्याच्या मित्राला फोन केला आणि सर्व प्रकार सांगत मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मदत मागितली. मित्राने त्याची भेट घेतली आणि समजूत घालत पोलिसांना घटना सांगण्याचे सुचविले. यानंतर मायलेकांनी हुडकेश्वर ठाण्यात पोहोचून घटना सांगितली. त्यानंतर पोलिसांनी दोघांवर हत्येचा गुन्हा दाखल करीत त्यांना ताब्यात घेतले आहे.

# 'री-कार्पेटिंग'ला विलंब; मिहान, विमानतळ व्यवस्थापन जबाबदार

## भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र




**लोकशाही वार्ता/नागपूर**

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीच्या री-कार्पेटिंगचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. या प्रकरणी भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल करून धावपट्टीच्या री-कार्पेटिंगच्या विलंबासाठी मिहान इंडिया लिमिटेड आणि नागपूर विमानतळ व्यवस्थापनाला जबाबदार धरले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील रनवे री-कार्पेटिंगचे काम पूर्ण न झाल्याने हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आहे. प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दखल घेत स्वतःहून जनहित याचिका दाखल केली आहे. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने एएआयला उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले होते. एएआयने सोमवारी उत्तर दाखल केले. त्यानुसार, एआयने ऑक्टोबर २०२४ मध्ये अचानक काम बंद केल्याच्या विरोधात ऑक्टोबरमध्येच औपचारिक पत्रव्यवहाराद्वारे निषेध केला होता. मात्र, मिहान आणि विमानतळ व्यवस्थापकाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. याशिवाय मनुष्यबळ आणि उपकरणांच्या निष्क्रियतेमुळे झालेल्या नुकसानीचा उल्लेख कंत्राटदाराच्या तक्रारीत करण्यात आला आहे. यामुळे समस्या अधिक गुंतागुंतीची झाली. अखेरीस २४ नोव्हेंबर २०२४ रोजी पुन्हा काम सुरू करण्याची परवानगी देण्यात आली. धावपट्टीवर काम करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याचेही एएआयने न्यायालयाला सांगितले. म्हणजेच डिसेंबर २०२४ मध्ये ३१ दिवसांपैकी केवळ १४ दिवस कामासाठी उपलब्ध होते. दरम्यान, पुढील विलंब टाळण्यासाठी मिहान आणि विमानतळ व्यवस्थापक यांच्यात नियमित संवाद आणि मुदतींचे पालन करण्याचे आदेश न्यायालयाने द्यावेत. यासोबतच दररोज आठ तास सतत काम करण्यास सहकार्य करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही एएआयने केली आहे.

# 'प्रशासक राज' येताच १७ कर्मचाऱ्यांना दाखविला घरचा रस्ता

## कर्मचाऱ्यांनी गयावया करूनही प्रशासनाला पाझर फुटेना

**लोकशाही वार्ता / नागपूर**

जिल्हा परिषदेमध्ये सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात येऊन प्रशासक राज येऊन बहात्तर तासांचा कालावधी लोटत नाही, तेच प्रशासनाने १७ कंत्राटी कर्मचाऱ्यांची अचानक सेवा समाप्त केली आहे. हे कर्मचारी गेल्या कित्येक वर्षांपासून जि.प.तील पदाधिकाऱ्यांच्या कक्षासह विविध ठिकाणी आपली सेवा देत होते. परंतु अचानक सोमवार, २० जानेवारीला त्यांच्या सेवासमाप्तीचे आदेश जारी झाल्याने त्यांना चांगलाच धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, अचानक हातचे काम गेल्यामुळे महिला कर्मचाऱ्यांनी गयावया केली, परंतु




प्रशासनाला मात्र पाझर फुटला नाही.

जि.प.मध्ये विविध कामे करण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर सेवा घेण्यात येते. यामध्ये हे कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी पुरविण्याचे काम मे.ओमसाई असोसिएशन यांच्याकडे होते. त्या कंत्राटदाराने २७ कर्मचाऱ्यांनी नियुक्त केले होते. यातील काही कर्मचारी हे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चार विषय समिती सभापतींच्या कक्षासह निवासस्थानी तर काही अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासह कार्यालयामध्ये सेवा बजावित होते. त्यांचा कंत्राट महिनाभरापूर्वीच संपुष्टात आला. त्यानंतरही त्या कंत्राटदाराची सेवा सुरू होती. मात्र, १७ जानेवारी रोजी पदाधिकारी राज जाऊन जि.प.मध्ये 'प्रशासक राज' आला, तेच ७२ तासांचा कालावधी लोटण्यापूर्वीच प्रशासनाने पत्र काढून १७ कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे पत्र कंत्राटदाराला दिले. विशेष म्हणजे बेरोजगारीमुळे तुटपुंज्या वेतनात उच्च शिक्षित कर्मचारी सेवा देत होते. अचानक सेवा समाप्तीची माहिती मिळताच महिला कर्मचाऱ्यांना अश्रू अनावर झाले होते. आता कुटुंबाचा गाडा कसा हाकावा, याच विवंचनेत असताना त्यांनी सीईओ विनायक महामुनी यांचीही भेट घेतली. परंतु, महामुनी यांनीही त्यांना कामावर ठेवण्यास असमर्थता व्यक्त केली. त्या महिला कर्मचारी दिवसभर अधिकाऱ्यांच्या कक्षाच्या पायऱ्या झिजवत राहिल्यात, शिवाय जि.प. आवारामध्ये रडत होत्या, परंतु निर्दयी प्रशासनाला पाझर फुटला नाही.

## प्राणघातक शस्त्रासह गुंडाला अटक

**नागपूर :** सार्वजनिक ठिकाणी प्राणघातक शस्त्रासह फिरणाऱ्या गुंडाला नंदनवन पोलिसांनी अटक केली. त्याच्या ताब्यातून एक लोखंडी चाकू पोलिसांनी जप्त केला. शेख नजीर शेख वजीर (वय ३४, रा. मदिना मशिदीजवळ हसनबाग, नंदनवन) असे या आरोपी गुंडाचे नाव आहे. पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, एका दारूच्या दुकानाजवळील मोकळ्या जागेत त्यांना उपरोक्त आरोपी हा संशयास्पदरित्या दिसला. पोलिसांना बघून तो पळू लागल्याने पोलिसांनीही त्याचा पाठलाग केला. त्याला ताब्यात घेतले.

# कुणाच्या हत्येचा राजकीय हत्यार म्हणून वापर होऊ नये

## मंत्री पंकजा मुंडे यांचे प्रतिपादन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

कुणाची हत्या हे राजकारणाचे हत्यार होऊ शकत नाही, हा कलंक आहे. तो पुसण्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केला पाहिजे. मुळात बीड शांत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनादेखील त्याचा अनुभव येईल, असा दावा पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी डॉ.



बाबासाहेब आंबेडकर नागपूर आंतराष्ट्रीय विमानतळावर माध्यमांशी बोलताना केला. एका कार्यक्रमासाठी नागपुरात आल्या असता पंकजा मुंडे प्रसार माध्यमांशी बोलत होत्या.

### पालकमंत्रिपदाबाबत भाष्य

मी बीडची मुलगी असल्याने जर मला बीडचे पालकमंत्री पद मिळाले असते तर बीडची अधिकाधिक सेवा करण्याची संधी मला मिळाली असती. अधिकच आनंद झाला असता. किंबहुना माझा पाच वर्षातील कार्यकाळ बीडसाठी सर्वाधिक विकसनशील राहिला आहे, असा दावाही ना. पंकजा मुंडे यांनी केला. महायुतीत सध्या पालकमंत्री पदावरून राजी नाराजी पाहायला मिळत आहे. नाशिक, रायगड पालकमंत्रिपद घोषणेला स्थगिती दिली गेली आहे. या संदर्भात विचारले असता, मला याची काही कल्पना नाही असेही पंकजा मुंडे यांनी सांगितले. जालनाचे पालकमंत्रिपद मला मिळाले. जालना पण, माझ्यासाठी नवीन नाही. जालन्यासोबत बीडकडे दुहेरी लक्ष मला द्यावे लागेल. बीडचे पालकमंत्री अजितदादा आहेत. ते आम्हाला पूर्ण सहकार्य करतील असा मला विश्वास आहे, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

# जंगल सफारीचे 'एआय मॉनिटरिंग' : २५ हजार रुपयापर्यंत दंड

## उच्च न्यायालयात वनविभागाचे प्रतिज्ञापत्र : उमरेड-कऱ्हांडला येथे वाघांचा मार्ग अडविल्याचे प्रकरण

**लोकशाही वार्ता/नागपूर**

उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात एफ-२ वाघिणीचा आणि तिच्या पाच पिल्लांचा मार्ग पर्यटकांनी अडविला होता. याची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका दाखल केली आहे. याप्रकरणी वनविभागात प्रतिज्ञापत्र दाखल करून नवीन 'एसओपी'ची माहिती देण्यात आली. शिवाय जंगल सफारी आणि जंगलातील इतर बाबींवर एआय टुल्सद्वारे लक्ष ठेवले जाईल. तसेच नियमांचे उल्लंघन केल्यास ३ हजार रुपयांपासून ते २५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार आहे.

नवीन नियमांमध्ये पर्यटकांच्या शिस्तबद्ध वर्तनासाठी विशेष नियम घालून दिले आहेत. ज्यात वाघांच्या सुरक्षेसाठी मोबाईल आणि कॅमेऱ्यांचा नियंत्रित वापर आणि पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकच्या वापरावर बंदी यांसारख्या उपाययोजनांचा समावेश आहे. ३१ डिसेंबर रोजी उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात पर्यटकांनी वाघांचा रस्ता अडविला होता. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. विविध वृत्तपत्रांमध्ये त्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. याची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने जनहित याचिका दाखल करून या संपूर्ण प्रकरणात वनविभागाकडून स्पष्टीकरण मागविले होते. तसेच न्यायालयाने जंगल सफारीसाठी कडक नियम लागू करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सोमवारी वनविभागाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात नव्या नियमावलीची माहिती देण्यात आली.

> या नव्या नियमानुसार ड्रायव्हर आणि गाईडने वाघिणी आणि तिच्या पिल्लांच्या जवळ थांबू नये, असे वनविभागाने स्पष्ट केले. फक्त नोंदणीकृत चालक आणि मार्गदर्शकांनाच प्रवेश दिला जाईल. त्यांनी त्यांच्या वाहनांची नोंदणी करणे आवश्यक आहे आणि योग्य पोशाख घालणे आवश्यक आहे. जंगलात वाहनांचा वेग ताशी तीस किलोमीटरपेक्षा जास्त असता कामा नये, असेही नियम करण्यात आले आहेत.

# मनपा मुख्यालयात नागरिकांसाठी विशेष स्वागत कक्ष

**लोकशाही वार्ता/नागपूर**

नागपूर महानगरपालिकेत येणाऱ्या नागरिकांसाठी विशेष कक्ष तयार करण्यात आला असून, येथे एकाच ठिकाणी नागरिकांना सर्व माहिती एकाच ठिकाणी मिळणार आहे. या स्वागत कक्षाचे सोमवारी मनपा आयुक्तांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, उपायुक्त विजया बनकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, सामान्य प्रशासन विभागाचे राजकुमार मेश्राम, आयुक्तांचे स्वीय सहाय्यक प्रमोद हिवसे, तिलकचंद भुरे, सुरेश खरे, ज्येष्ठ नागरिक दिलीप राऊत आणि अजय देवरणकर यांच्यासह इतर कर्मचारी व नागरिकांची उपस्थिती होती. नागरिक मनपा मुख्यालयात आल्यानंतर मुख्यालयातील विविध विभाग आणि अधिकारी यांच्यासह झोनमधील अधिकारी यांची तत्काळ माहिती मिळावी तसेच शासनाच्या योजनांची माहिती मिळण्याकरिता नागरिकांना कुठलाही त्रास होऊ नये, याकरिता या स्वागत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महापालिकेकडून नागरिकांच्या सुविधाकरिता मनपा स्वागत कक्षाचे फलक लावण्यात आले आहे. याशिवाय स्वागत कक्षात कर्मचाऱ्यांनी नेमणूक करण्यात आली असून, येथे येणाऱ्या नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, ही दक्षता घेतली जाणार आहे. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# व्यावसायिकाची भररस्त्यात लुटपाट

## मध्यप्रदेशातून आरोपींना अटक

**लोकशाही वार्ता/नागपूर**

जरीपटक्यात एका व्यावसायिकाला भररस्त्यात लुटले गेले. नागरिक मदतीला आले तेव्हा आरोपींनी चाकूच्या धाकावर पळ काढला. तपासात पोलिसांनी दीडशेहून अधिक सीसीटीव्ही तपासल्यानंतर चार दिवसांनी आरोपींची माहिती काढत चौघांना अटक केली. यातील दोघांना पोलिसांनी मध्यप्रदेशातून ताब्यात घेतले. रिषभ अग्रवाल (२५), यश गोंडाणे (२४), विक्की धुवारे आणि सुजल पाटील (२२) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

माहतीनुसार, फिर्यादी घनश्याम वासवानी (५५, रा. इंद्रा कॉलनी, जरीपटका) यांचे इतवारी येथील तीननल चौकाजवळ मेट्रो सेल्स नावाने भाड्यांचे दुकान आहे. नेहमीप्रमाणे त्यांनी रात्री १० वाजता दुकान बंद करताना व्यवसायातील दीड लाखांची रक्कम बॅगमध्ये घेतली आणि घराकडे निघाले. दरम्यान, काही अंतरावर दोन दुचाकीस्वारांनी त्यांला अडविले. त्यांच्याजवळील बॅग मागितली. मात्र, वासवानी यांनी देण्यास नकार दिल्याने दोघांही त्यांना जबार मारहाण केली. काहीच अंतरावर असलेले आरोपींचे अन्य तीन साथीदार हेदेखील येथे आले आणि यातील एकाने वासवानी यांच्यावर वार केले. यावेळी, वासवानी मदतीसाठी जोरजोराने हाक मारीत होते. तिकडे बॅग हाती लागताच आरोपी पळून जात असतानाच अनेक नागरिक जमा झाले. यावेळी आरोपींनी त्यांना चाकूचा धाक दाखवत पळ काढला. तपासात वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण क्षीरसागर यांनी परिसरातील जवळपास १५० सीसीटीव्ही फुटेज तपासले. यातील एका फुटेजमध्ये आरोपींनी गुन्ह्यात वापरलेल्या वाहनाची नंबर प्लेट दिसली. त्यावरून वाहन मालकाचा पत्ता शोधला. मात्र, गुन्हेगार पोलिस अभिलेखावर नसल्याने त्यांची ओळख पटत नव्हती. उपरोक्त नंबरचे वाहन कोण चालवितो, याचा शोध घेण्यासाठी गुप्तहेर कामी लावले. त्यांच्या माहितीवरून पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. त्यांची सखोल चौकशी केली असता गुन्ह्याची कबुली दिली. दरम्यान, आरोपींनी लुटीच्या रकमेची आपापसात वाटणी करून घेतली. पैसे कपडे आणि मनसोक्त खाण्यावर खर्च केले. बारमध्ये जाऊन बारबालांवर उडविले. मोठी रक्कम रिषभ आणि यशजवळ होती. ते दोघेही उज्जैनला पळून गेले होते. एक पथक उज्जैनला पाठविण्यात आल्यानंतर आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'डीएचओं'चा दणका

## प्रयोगशाळा तंत्रज्ञासह नऊ जणांना कारणे दाखवा

**लोकशाही वार्ता / नागपूर**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या आरोग्य संस्थांना मध्यरात्रीच्या सुमारास आकस्मिक भेटीचा कार्यक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) डॉ. राजकुमार गहलोत यांनी चालविला आहे. त्यानुसार त्यांनी दोन दिवसांपूर्वी भेटी दिलेल्या आरोग्य संस्थांमध्ये काही कर्मचारी हे मुख्यालयी न राहत असल्याचे निदर्शनास आले होते. अशा ९ अधिकारी, कर्मचाऱ्यांना डीचओंकडून कारणे दाखवा बजाविण्यात आली आहे. सोबतच त्यांना याचे उत्तर लेखी स्वरूपात तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

आरोग्य सेवा ही रुग्णसेवेच्यादृष्टीने अतिमहत्त्वाची आणि २४ बाय ७ कायम सुरू




असणारी बाब आहे. त्यामुळे या संस्थांमध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांना मुख्यालयी राहून आपली सेवा बजाविणे क्रमप्राप्त आहे. परंतु अनेक कर्मचारी हे मुख्यालयी न राहत असल्याचे नुकत्याच जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ)डॉ. राजकुमार गहलोत यांच्या मध्यरात्रीच्या आरोग्य संस्थांना दिलेल्या आकस्मिक भेटीतून पुढे आले आहे. शुक्रवार, १७ जानेवारीला महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जि.प.तील सर्व विभागांचा आढावा घेत विभागप्रमुखांनी मुख्यालयात ठाण मांडून न बसता प्रत्यक्ष 'फिल्ड'वर काम करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या आढाव्याला 'बारा तासां'चा कालावधी लोटण्यापूर्वीच जि.प.प्रशासन 'अ‍ॅक्शन मोड'वर आल्याचे पहायला मिळाले.

> 
>
> **चिचोली व गुमथळा पीएचसीतील ९ कर्मचाऱ्यांना मुख्यालयी गैरहजर असल्याबाबत कारणे दाखवा बजाविण्यात आली आहे. यापुढेही अशाच पद्धतीने आकस्मिक भेटीतून कुठल्याही वेळी आरोग्य संस्थांना भेटी देण्यात येईल आणि त्यावेळी ड्यूटीच्या ठिकाणी अर्थात मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.**
>
> **- डॉ. राजकुमार गहलोत,** जिल्हा आरोग्य अधिकारी

डीएचओ डॉ. राजकुमार गहलोत यांनी त्यांच्या स्तरावर नेमलेल्या भरारी पथकासह शुक्रवारला मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास प्राथमिक आरोग्य केंद्र (पीएचसी) सावनेरमधील चिचोली आणि कामठीतील गुमथळा येथे अचानक भेटी दिल्या. त्यामुळे आरोग्य संस्थांमध्ये उपस्थितांची एकच भंबेरी उडाली. यावेळी डॉ. गहलोत यांनी आरोग्य संस्थांमधील औषधी भंडार, शस्त्रक्रिया गृह, रुग्णांकरिता असलेली वॉर्डांची पाहणी केली. तसेच उपस्थित असलेल्या वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांच्याकडून सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी त्यांना आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी हे मिळून आले. परंतु काही कर्मचारी मुख्यालयी गैरहजर असल्याचे दिसून आले. त्यामुळे अशा गैरहजर ९ कर्मचाऱ्यांना डीएचओ कार्यालयाकडून सोमवारी कारणे दाखवा बजाविण्यात आली. कारणे दाखवा बजाविण्यात आलेल्यांमध्ये दोन औषध निर्माण अधिकारी, तीन आरोग्य सहाय्यक (पु.), दोन प्रयोगशाळा तंत्रज्ञ, एक आरोग्य सहाय्यक महिला आदींचा समावेश आहे.

दृष्टिक्षेप

## जयेश कुलकर्णी, ज्ञानेश्वरी पाथरकरला विजेतेपद



**नागपूर :** केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील टेबल टेनिस स्पर्धेच्या अंतिम लढतीत जयेश कुलकर्णी आणि ज्ञानेश्वरी पाथरकर यांनी प्रतिस्पर्धींना नमवून पुरुष व महिला गटातील विजेतेपद पटकाविले. महाल येथील रामजीवन चौधरी सभागृहामध्ये ही स्पर्धा पार पडली.

पुरुष गटातील अंतिम लढत जयेश कुलकर्णी विरुद्ध वैभव राणे यांच्यात झाली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत पहिल्या सेटमध्ये जयेश कुलकर्णी ने आघाडी घेतली. मात्र दुसऱ्या सेटमध्ये वैभव राणेने बरोबरी साधली. दोन सेट आघाडी बरोबरीत गेल्यानंतर अखेर तिसऱ्या निर्णायक सेटमध्ये जयेश कुळकर्णीने सामन्यात विजय संपादित केला. हा सामना जयेश कुळकर्णीने ११-८, ५-११, ११-४, ७-११, ११-५ ने जिंकून विजेतेपद प्राप्त केले. महिलांच्या अंतिम फेरीत ज्ञानेश्वरी पाथरकर विरुद्ध हर्षाली देवगडे यांच्यात लढत झाली. सामन्यात ज्ञानेश्वरी पाथरकरने हर्षाली देवगडेचा ११-१, ११-८, ११-४ असा तीन सेटमध्ये पराभव करून विजेतेपदावर मोहोर उमटविली. यापूर्वीच्या उपांत्य फेरीत पुरुष गटात जयेश कुलकर्णी याने लावण्य धकाते याला मात देऊन अंतिम फेरीत प्रवेश केला होता. दुसऱ्या उपांत्य लढतीत वैभव राणेने कौस्तुभ उदारला नमवून जयेश कुळकर्णीचे अंतिम फेरीतील आव्हान स्वीकारले. महिला गटात ज्ञानेश्वरी पाथरकरने लावण्या गिरनारेचा व हर्षाली देवगडे हिने वेणुश्री शर्माचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

## ७ व ८ फेब्रुवारीला आंतरराष्ट्रीय परिषद

**नागपूर :** वायसीसीईच्या वतीने संगणकीय विकास, नियंत्रण आणि दूरसंचार तंत्रज्ञानातील प्रगतीवर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद 'ॲक्ट-२०२५' चा पहिला टप्पा येत्या ७ व ८ फेब्रुवारीला यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय (वायसीसीई), हिंगणा, नागपूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आला आहे.

**वायसीसीईचे आयोजन**

इन्स्टिटच्यूट ऑफ डॉक्टर्स, इंजिनिअर्स आणि सायंटिस्ट्स (आयडीईएस) च्या सहकार्याने आयोजित या परिषदेत विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि उद्योग व्यावसायिकांना नावीन्यपूर्ण संशोधन करण्यासाठी, कल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी आणि विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील प्रगतीवर चर्चा करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध होत आहे. ॲक्ट-२०२५ मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजेंस, मशिन लर्निंग, बिग डेटा, रोबोटिक्स, डिजिटल कम्युनिकेशन, क्लाउड कॉम्प्युटिंग, इमेज प्रोसेसिंग, बायोइन्फॉरमॅटिक्स आदी विषयांचा समावेश राहणार आहे. सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि आरोग्यसेवा अभियांत्रिकी यासारख्या क्षेत्रातील संगणकीय, नियंत्रण आणि दूरसंचार यासह विविध क्षेत्रांमध्ये मूळ, अप्रकाशित शोध निबंध आमंत्रित करण्यात आले आहेत. कविता आर. सिंग आणि ललित बी. दमाहे यांनी या परिषदेचे आयोजन केले असून, नीलेश सिंग, व्ही. ठाकूर आणि राखी डी. वाजगी हे आयोजन सचिव आहेत.

## पेन्शन योजनेसाठी आशा वर्कर्सचा मोठा लढा गरजेचा - राजेंद्र साठे

**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियनच्या नागपूर जिल्हा शाखेतर्फे गुरुदेव सेवाश्रम येथे नुकताच कार्यकर्ता मेळावा आयोजिण्यात आला. मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साठे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की सप्टेंबर २०१८ पासून केंद्र शासनाने मोबदल्यामध्ये कोणतीही वाढ केली नाही. कोरोनाच्या काळात आशा वर्कर व गटप्रवर्तकांकडून महत्त्वाची कामे करून घेतल्यानंतरसुद्धा कोणताही मोबदला दिलेला नाही. सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या पेन्शनचा मुद्दाही दुर्लक्षित आहे. पेंशनसह इतर लाभ मिळावे यासाठी आशा वर्कर्सचा मोठा लढा फार गरजेचा आहे.

राजेंद्र साठे पुढे म्हणाले की, सेवानिवृत्तीनंतर ५ लाख रुपये ग्रॅच्युईटी, १० हजार रुपये मासिक पेन्शन व २ हजार रुपये दिवाळी बोनस आशा वर्कर व गटप्रवर्तकांना मिळावा यासाठी चालू वर्षात मोठे आंदोलन करण्याची गरज आहे. आशा वर्कर व गटप्रवर्तकांच्या प्रत्येक चळवळीला कमजोर करण्याकरिता मानधनाची तफावत ठेवून द्वेष निर्माण करण्याचा घाट महायुती सरकारने घातला. त्याचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटत असून, राज्य शासनाला भविष्यामध्ये त्याचे परिणाम भोगावे लागतील, असे त्यांनी सांगितले. जिल्हा महासचिव प्रिती मेश्राम यांनी संघटना बांधणी कशी करायची, आशा वर्करच्या कामकाजाची पद्धती, मिळणारा मोबदला व संघटनेवर विश्वास ठेवून एकजुटता कायम राखणे यावर भर दिला. तसेच कुटुंबाच्या हितासाठी संघटनेबरोबर सोबत राहून मोठा लढा लढण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. आभार शहर सचिव रंजना पौनीकर यांनी मानले.

# 'झुडपी जंगल'मधील जंगल शब्दामुळे विकासकामांना अडथळा

## केंद्रीय सशक्तता समितीकडून आढावा : माहिती लवकरच न्यायालयापुढे होणार सादर

**लोकशाही वार्ता/नागपूर**

नागपूर विभागात झुडपी जंगल यातील जंगल या शब्दामुळे या जमिनींना वनसंवर्धन कायदा लागू होतो. यामुळे विविध विकासकामांना आळा बसला आहे. दरम्यान, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या केंद्रीय सशक्तता समितीचे सदस्य चंद्रप्रकाश गोयल व सुनील लिमये यांनी नागपूर विभागातील झुडपी जंगलाबाबच्या प्रश्नाचा आढावा घेतला. यासंदर्भात ही समिती सर्वोच्च न्यायालयाला लवकरच अहवाल सादर करणार आहे.



**नागपूर विभागात झुडपी जंगल यातील जंगल या शब्दामुळे या जमिनींना वनसंवर्धन कायदा लागू होतो. यामुळे विविध विकासकामांना आळा बसला आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय सशक्तता समिती गठीत करून या प्रश्नासंदर्भात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने यासमितीने जिल्हानिहाय आढावा घेऊन वस्तूस्थितीची माहिती घेतली. तसेच प्रत्यक्ष जागेचीसुद्धा पाहणी केली. यासंदर्भात ही समिती येत्या एक महिन्यात आपला अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सादर करणार आहे.**

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात नागपूर विभागातील झुडपी जंगलामुळे विकास कामांना अडथळा निर्माण होत असल्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या केंद्रीय सशक्तता समितीकडून आढावा घेण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, वन विभागाचे प्रधान वनसंरक्षक नरेश झुरमुरे, विभागातील सर्व जिल्हाधिकारी, महसूल व वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय सशक्तता समितीचे सदस्य चंद्रप्रकाश गोयल व सुनील लिमये यांनी प्रत्यक्ष बाबीसंदर्भात तसेच अभिलेखेमध्ये नोंदींची माहिती घेतली. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी समितीला सादरीकरणाद्वारे जिल्हानिहाय माहिती दिली. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहायक आयुक्त इंदिरा चौधरी यांनी झुडपी जंगलाबाबत विभागात असलेल्या वस्तुस्थितीची माहिती दिली. यावेळी विभागातील जिल्हाधिकारी विनय गौडा (चंद्रपूर), डॉ. संजय कोलते (भंडारा), अविशांत पंडा (गडचिरोली), प्रजित नायर (गोंदिया), वान्मथी सी. (वर्धा) तसेच नागपूरचे अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे व महसूल उपायुक्त राजलक्ष्मी शहा यांनी जिल्ह्यातील झुडपी जंगलाबाबत असलेल्या सद्यास्थितीसंदर्भात बैठकीत माहिती दिली.

# लातूरला दुहेरी विजेतेपद



**लोकशाही वार्ता/नागपूर**

खासदार क्रीडा महोत्सवातील राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेमध्ये लातूर संघाने दुहेरी विजेतेपद पटकाविण्याची कामगिरी केली. २१ वर्षाखालील मुले आणि १८ वर्षाखालील मुलींच्या गटात लातूर संघाने प्रतिस्पर्धी संघांना मात देत विजेतेपद पटकाविले. समर्थ व्यायामशाळा प्रतापनगर येथे ही स्पर्धा पार पडली.

खासदार क्रीडा महोत्सवाचे प्रेरक ना. नितीन गडकरी यांनी स्पर्धेच्या अंतिम सामन्यांचा आनंद घेतला. त्यांनी सामना सुरू होण्यापूर्वी खेळाडूंशी हस्तांदोलन केले व शुभेच्छा दिल्या. त्यांनी विजेत्यांना पुरस्कार देखील प्रदान केले. रविवारी रात्री २१ वर्षाखालील वयोगटात मुलांच्या लढतीत लातूर संघाचा सामना मुंबई संघाशी झाली. सामन्यात सुरुवातीपासूनच लातूरने आपला दबदबा कायम ठेवला. मुंबई संघाला २५-१८, २६-२४, २५-२२ ने मात देत लातूरने अंतिम लढतीत वर्चस्व सिद्ध केले. याच वयोगटात पुणे संघाच्या मुलींनी नाशिकचा पराभव केला. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या लढतीत अनेक निर्णायक क्षण आले. पण अखेर पुणे संघाने बाजी मारली. पुणे संघाने २५-२२, २५-२०, २०-२५, २५-२३ ने सामना जिंकून स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त केले. १८ वर्षाखालील मुलांच्या वयोगटात लातूर संघाला मुंबई संघाकडून पराभव स्वीकारावा लागला. अंतिम सामन्यात मुंबईने २८-२६, २५-१८, १३-२५, २५-२० ने लातूरचा पराभव करून जेतेपद मिळविले.

मुलींच्या गटात लातूरने पुणे संघाला नमवून विजेतेपदावर मोहोर उमटविली. लातूरने सुरुवातीपासूनच दबदबा कायम ठेवत २५-११, २५-१६, २५-२२ ने अंतिम सामना जिंकला. खासदार क्रीडा महोत्सवाचे प्रेरक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले. याप्रसंगी खासदार क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबूलकर, आशिष मुकीम, प्रमोद तभाने, विशाल लोखंडे, नितीन महाजन, सोनाली कडू, शिल्पा कुकडे, व्हॉलिबॉल असोसिएशनचे सुनील हांडे, सौरभ रोकडे उपस्थित होते.

# ब्रिज स्पर्धेत नागपूर 'चॅम्पियन'

**लोकशाही वार्ता/नागपूर**

ना. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून नागपूर शहरात सुरू असलेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील ब्रिज स्पर्धेत नागपूर संघ चॅम्पियन ठरला. शंकरनगर येथील विदर्भ ब्रिज असोसिएशनच्या क्रीडा संकुलामध्ये ही स्पर्धा पार पडली.



स्पर्धेत विदर्भातील ६० पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. 'चॅम्पियन' नागपूर संघाकडून एम. मोर, व्ही. पुराणिक, व्ही. साबू, एस. वाटवे, एम. लुले आणि एम. दत्ता यांनी विजयी कामगिरी केली. मोहोता संघ उपविजेता ठरला. उपविजेत्यांच्या संघाकडून वसंत आणि अनुराग मोहोता या पिता-पुत्र जोडीसह एस. छाजेड आणि अनिलकुमार मोहोता यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले. प्लेवेल संघाला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. प्लेवेल संघाकडून राजा आणि अमित रेवतकर या पिता पुत्र जोडीसह नीरज आणि संजीव कुमार या भावंडांनी उत्कृष्ट कामगिरी केली. नागपूर २ ने पेअर्स प्रोग्रेसिव्ह प्रकारात विजय मिळवला. विजेत्या संघात आर. देशपांडे, जी. दत्ता, एस. वाटवे आणि एम. दत्ता यांचा समावेश होता. या प्रकारात उपविजेता ठरलेल्या नागपूर १ संघामध्ये एम. मोर, व्ही. साबू, व्ही. पुराणिक आणि एम. लुले यांचा समावेश होता. एमपी पेअर्स प्रकारात राजा आणि अमित रेवतकर या पिता-पुत्र जोडीने अव्वल स्थान पटकाविले. डी. मांडपे आणि एस. खानझोडे जोडी दुसऱ्या क्रमांकावर राहिली.

आयएमपी पेअर्स प्रकारात बसंत आणि अनुराग मोहोता या पिता पुत्र जोडीने विजेतेपद प्राप्त केले. एस. छाजेड आणि एस. रॉय उपविजेते ठरले. स्पर्धेचे संचालन अनिलकुमार मोहोता आणि अमित रेवतकर यांनी केले. सर्व विजेत्यांना आकर्षक रोख पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# 'बॉलिवुड क्लासिक्स' उद्या

**लोकशाही वार्ता/नागपूर**

श्री सिद्धीविनायक पब्लिसिटीतर्फे आयोजित 'बॉलिवुड क्लासिक्स' हा सदाबहार हिंदी गाण्यांचा कार्यक्रम बुधवार, २२ जानेवारीला सायंकाळी ६ वाजता सायंटिफीक सभागृह, लक्ष्मीनगर येथे आयोजिण्यात आहे.

कार्यक्रमाची संकल्पना श्री सिद्धीविनायक पब्लिसिटीचे संचालक समीर पंडित यांची असून, यात स्वाती खडसे, निकेता जोशी, ज्योती बनकर या अतिथी गायिकांसह दत्तात्रय वाझरकर, नीरजा धांडे, समीक्षा चरडे, सुवर्णा पंत, अनिल नायर, हर्षवर्धन वैरागडे, प्रशांत अनवाने, आशिष पाटील, श्रीकांत लाखे, किरण दहीवडकर हे गायक कलाकार गाणी सादर करणार आहेत. परिमल जोशी, नितीन अहिरे, पंकज यादव, महिंद्र वातुलकर, राजू गजभिये हे वादक कलाकार त्यांना साथ देतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजे तेजल करणार आहेत. या निःशुल्क कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांद्वारे करण्यात आले आहे.

# मराठा, विक्रांत, साई, रवींद्र उपांत्य फेरीत

**लोकशाही वार्ता/नागपूर**

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेत मुले व मुलींमध्ये मराठा लॉन्सर्स महाल, मराठा लॉन्सर्स धरमपेठ, विक्रांत स्पोर्टिंग नागपूर, मराठा लॉन्सर्स काटोल, साई स्पोर्टिंग काटोल, केसरी क्रीडा मंडळ कळमेश्वर, रवींद्र क्रीडा मंडळ उमरेड या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. विभागीय क्रीडा संकुल मानकापूरच्या इनडोअर स्टेडियममध्ये २१ जानेवारी रोजी स्पर्धेचे उपांत्य फेरीतील सामने होतील.



उपांत्यपूर्व फेरीत मुलांच्या गटात मराठा लॉन्सर्स महाल संघाने न्यू ताज क्रीडा मंडळ नागपूर संघाचा ३६-१० ने, मराठा लॉन्सर्स धरमपेठ संघाने नागसेन क्रीडा मंडळ कामठी संघाचा ३०-१६ ने, विक्रांत स्पोर्टिंग नागपूर संघाने रवींद्र क्रीडा मंडळ उमरेड संघाचा ३७-२७ ने आणि मराठा लॉन्सर्स काटोल संघाने एकता क्रीडा मंडळ पारडी संघाचा ४८-१४ ने पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत मराठा लॉन्सर्स महाल विरुद्ध मराठा लॉन्सर्स धरमपेठ आणि विक्रांत स्पोर्टिंग नागपूरविरुद्ध मराठा लॉन्सर्स काटोल यांच्यात लढत होईल.

मुलींच्या उपांत्यपूर्व फेरीत साई स्पोर्टिंग काटोल मात संघर्ष क्रीडा मंडळ नागपूर संघाचा ४५-२९ ने, केसरी क्रीडा मंडळ कळमेश्वर संघाने मराठा लॉन्सर्स महाल संघाचा ४१-३० ने, विक्रांत स्पोर्टिंग नागपूर संघाने श्रीगजानन चक्रधरनगर नागपूर संघाचा ३६-१३ ने आणि रवींद्र क्रीडा मंडळ उमरेड संघाने श्रीसाई स्पोर्टिंग नागपूर संघाचा ४०-३४ ने पराभव करून उपांत्यफेरीत स्थान निश्चित केले. उपांत्यफेरीत साई स्पोर्टिंग काटोल संघाची केसरी क्रीडा मंडळ कळमेश्वर संघासोबत आणि विक्रांत स्पोर्टिंग नागपूर संघाची रवींद्र क्रीडा मंडळ उमरेड संघासोबत लढत होईल. दोन्ही वयोगटातील उपांत्य सामने मंगळवारी होतील.

# जलतरण स्पर्धेत श्रीपाद काळे यांची यशस्वी कामगिरी




**लोकशाही वार्ता/नागपूर**

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून नागपूर येथे सुरू असलेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील जलतरण स्पर्धेत श्रीपाद काळे यांनी १०० मीटर बॅकस्ट्रोक स्पर्धेत रजत पदक तर २०० मीटर बॅकस्ट्रोक स्पर्धेत कांस्य पदक पटकाविले.

महावितरणच्या नागपूर परिमंडळातील बुटीबोरी शहर शाखेत सहायक अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या श्रीपाद काळे यांनी या स्पर्धेतील १०० मीटर बॅकस्ट्रोक स्पर्धेत व्दितीय क्रमांक प्राप्त करीत रजत पदक तर २०० मीटर बॅकस्ट्रोक स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करीत कांस्य पदक पटकाविले. यापूर्वी मागील वर्षीच्या खासदार क्रीडा महोत्सवात जलतरण या क्रीडा प्रकारात १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि २०० मीटर बॅकस्ट्रोक या दोन्ही स्पर्धेत श्रीपाद काळे यांनी प्रथम क्रमांक मिळवित सुवर्ण पदक आणि १०० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त केले आहे. याशिवाय सुपर मास्टर्स गेम्स अँड स्पोर्टस् फेडरेशनच्या अखत्यारीतील मास्टर्स गेम्स असोसिएशन, गोवा यांच्या विद्यमाने मडगाव येथे आयोजित ६ व्या राष्ट्रीय मास्टर्स गेम्स स्पर्धेत श्रीपाद काळे यांनी दोन सुवर्ण पदक आणि एक कांस्य पदक पटकाविले असून अनेक राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्पर्धांतून त्यांची कामगिरी उल्लेखनीय ठरलेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता अमित परांजपे, कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे आणि इतर सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

निधन वार्ता

## ॲड. मधुकर घाटे



**नागपूर :** प्लॉट नंबर २/१, एमआयजी कॉलनी, वंजारीनगर निवासी ॲड. मधुकर डी. घाटे यांचे सोमवारी (ता.२०) निधन झाले. मृत्यूसमयी ते ९८ वर्षांचे होते. त्यांच्यापश्चात अतुल, अमोल ही दोन मुले आणि बराच आप्त परिवार आहे. त्यांचे पार्थिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला दान करण्यात आले. कुटुंबीयांनी ॲड. मधुकर घाटे यांचे देहदान करून समाजासमोर एक आदर्श प्रस्थापित केला आहे.

# ई-रिक्षात महिला चोरांचा सुळसुळाट

## प्रवासी महिलेचे २.६० लाखांचे दागिने चोरले

**लोकशाही वार्ता/नागपूर**

ई-रिक्षातून मुलाकडे जात असलेल्या आईच्या बॅगमधून दागिन्यांची डबी चोरीला गेली. ई-रिक्षात आधीपासूनच बसलेल्या दोन महिलांनी त्यांची नजर चुकवत हे २ लाख ६० हजार रुपयांचे दागिने चोरून नेले. सक्करदरा पोलिस ठाणे हद्दीत ही घटना घडली.

माहितीनुसार, पारशिवणी, कोळासावळी येथे फिर्यादी आशा रवींद्र ढोंगे (५६) राहतात. त्यांचा मुलगा नागपुरात ज्ञानेश्वरनगरात राहतो. रविवारी मुलाला भेटण्याकरिता त्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसने दुपारी नागपूर मध्यवर्ती गणेशपेठ बसस्थानकावर उतरल्या. येथून त्यांनी ज्ञानेवश्वरनगरला जाणारा ई-रिक्षा थांबविला. या रिक्षात आधीपासूनच दोन महिला बसल्या होत्या. आशा ढोंगे रिक्षात चढल्यानंतर आरोपी दोन्ही महिलांनी गणेशपेठ बसस्थानक ते सक्करदरा चौकादरम्यान, आशा ढोंगे यांची नजर चुकवत त्यांच्याजवळ असलेल्या बॅगची चेन उघडली. बॅगमध्ये एका डबीत २ लाख ६० हजार रुपयांचे दागिने होते. ही डबी आरोपी महिलांनी चोरून नेली. आशा ढोंगे यांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर वेळ निघून गेली होती. त्यांनी सक्करदरा पोलिसात तक्रार दिल्यानंतर ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक पांडे यांनी अज्ञात महिला आरोपींविरुद्ध कलम ३०३(२) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# ज्येष्ठांच्या आनंदमय जीवनासाठी प्रयत्नशील राहा - ना. नितीन गडकरी

## ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानच्या कार्यालयाचे थाटात उद्घाटन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानच्या नवीन कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातून नैराश्य दूर करा आणि ज्या-ज्या कार्याने ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण होईल ती कार्ये मार्गी लावण्याचा प्रयत्न करा, असा संदेश उद्घाटनानंतर ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानच्या विश्वस्त आणि सदस्यांना ना. गडकरी यांनी दिला.

सीताबर्डी परिसरातील वर्ड ट्रेड सेंटर, ग्लोकल मॉलमधील तळमजल्यावर हे नवीन कार्यालय थाटण्यात आले आहे. अनेक गणमान्य पाहुणे आणि शेकडो ज्येष्ठ जणांच्या उपस्थितीत ना. नितीन गडकरी आणि दत्ता मेघे यांनी फित कापून कार्यालयाचे उदघाटन केले. हे कार्यालय ज्येष्ठांकरिता सेवा केंद्र व्हावे, असे यावेळी दत्ता मेघे म्हणाले.



कार्यक्रमाला ज्यांच्या सौजन्याने कार्यालयाची जागा मिळाली आहे ते वर्ड ट्रेड सेंटरचे संचालक अनुप खंडेलवाल, भाजप नेते जयप्रकाश गुप्ता, हॉटेल अशोकाचे मालक संजय गुप्ता, साधना सहकारी बँकेचे अध्यक्ष घनश्याम कुकरेजा, माजी प्र-कुलगुरू गौरीशंकर पाराशर, माजी अधिष्ठाता डॉ. गोविंद वर्मा, राष्ट्रभाषा परिवारचे सुरेश अग्रवाल, ज्येष्ठ संपादक संजय तिवारी, डॉ. विनोद जयस्वाल, डॉ. शांतीदास लुंगे, ॲड. नामदेव फटिंग, नगरसेवक हरीश डिकोंडवार, कोल इंडियाचे अधिकारी राजेश आहुजा, कर्नल राजेश गुप्ता, डॉ. माधुरी इंदुरकर, सामाजिक कार्यकर्त्या कमला मोहता, नूतन रेवतकर, मंगला नागुलकर, नीलिमा श्रीवास्तव, रामनारायण कुळकर्णी, वेगवेगळ्या ज्येष्ठ नागरिकांच्या संस्थांचे पदाधिकारी ॲड. अविनाश तेलंग, मनोहर खर्चे, वसंत कळंबे, माजी न्यायाधीश भावना ठाकर, उद्योजक गुलशन कोहली, कृषितज्ज्ञ सतीश मोहोड, ज्येष्ठ कार्यकर्ते प्रकाश कुळकर्णी, भिकारीमुक्त अभियानच्या प्रतिभा कुमरे, तेली समाज सभेचे नानाभाऊ ढगे, सुरेश साठवणे, प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष अशोक मानकर, विश्वस्त बाळ कुळकर्णी, डॉ. संजय उगेमुगे, नानासाहेब समर्थ, मेहमूद अंसारी आदी उपस्थित होते. नवीन कार्यालयाची उदकशांती पूजाही करण्यात आली. डॉ. राखी खेडीकर आणि समीर खेडीकर पूजेचे यजमान होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रतिष्ठानचे सचिव डॉ. राजू मिश्रा यांनी सर्वांचे आभार मानले.

जावक क. ऐसीसी-2/464/2025
दि. 15.01.2025
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर
चौकशीची जाहीर नोटीस
अर्ज क्र. 390/2024-19

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र. JEEVAN DISHA, NAGPUR व्दारा C/o. Smt Vimal Yehejkel Salve, B/73, Akar Nagar, Katol Road, Nagpur, Shri Nitin Salve – अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि सहायक धर्मादाय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल / अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

1. वर नमुद केलेला न्यास अस्तीत्वात आहे काय? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
2. खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत : (वर्णन) रू. 5000/– अध्यक्ष यांचे जवळ जमा आहेत.
ब) स्थावर मिळकत : काही नाही

सदरच्या चौकशी प्रकारणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही **नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत** या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नागपूर यांचे शिक्कयानिशी आज दि. 15.01.2025 रोजी दिली.

शिक्का
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नागपूर विभाग नागपूर

जावक क. ऐसीसी-2/467/2025
दि. 15.01.2025
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर
चौकशीची जाहीर नोटीस
अर्ज क्र. 390/2024-19

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र. HOUSE OF FAITH CHURCH, NAGPUR व्दारा श्रीमती उज्वला नवनीत मेश्राम, प्लॉट नं. 25, घर क. 1471/बी/25, नटराज को. ऑप. हाउ. सोसा. गोरेवाडा, नागपूर, श्रीमती उज्वला नवनीत मेश्राम – अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि सहायक धर्मादाय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल / अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

1. वर नमुद केलेला न्यास अस्तीत्वात आहे काय? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
2. खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत : (वर्णन) रू. 5000/– अध्यक्ष यांचे जवळ जमा आहेत.
ब) स्थावर मिळकत : काही नाही

सदरच्या चौकशी प्रकारणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही **नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत** या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नागपूर यांचे शिक्कयानिशी आज दि. 15.01.2025 रोजी दिली.

शिक्का
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नागपूर विभाग नागपूर

दृष्टिक्षेप

## विद्यार्थ्यांवर संस्कार घडविणारी शाळा म्हणजे राष्ट्रीय सेवायोजना - डॉ. पोकळे



**शहर वार्ताहर/रामटेक**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नित श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेकचे हिवाळी शिबिर १८ ते २४ जानेवरी २०२५ ग्राम नंदापुरी येथे संपन्न होत आहे. या शिबिराचे उद्घाटन रविवारी खेमराज चापले यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शरद पोकळे सरांनी अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांवर संस्कार घडवणारी शाळा आहे. असे प्रतिपादन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अश्विनी स्वप्निल चापले, बेबीताई पडोळे उपस्थित होते. प्रास्ताविकात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनील कठाणे यांनी शिबिराची संकल्पना, उद्देश, मानवी मूल्य आणि संविधान साक्षरता आदी अंगाने येणाऱ्या सामाजिक बांधिलकीचे दायित्व पटवून दिले. संचालन जानू भंडारे तर आभार प्रा. तुलसीदास वाघमारे यांनी मानले.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत विरखंडी व आलेसूरच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी



**तालुका वार्ताहर/भिवापूर**

डब्लूसीएल उमरेड येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या विरखंडी (धापर्ला) व आलेसूर शाळेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील लंगडी स्पर्धेत उच्च प्रा. शाळा आलेसूर च्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकवीला तर २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत उच्च प्रा. शाळा विरखंडीचा विद्यार्थी शंतनू नानवटकर याने प्रथम क्रमांक पटकाविला. या यशाकरिता दोन्ही गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक व गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## वित्तेश्वर महिला पतसंस्था व समर्पण फाउंडेशनमध्ये हळदी-कुंकू कार्यक्रम



**वार्ताहर/वाघोडा/सावनेर**

सावनेर येथे १९ जानेवारीला शहरातील अग्रणी सामाजिक संस्था, समर्पण फाउंडेशन व वित्तेश्वर महिला पतसंस्था यांचा भव्य हळदी-कुंकवाचा कार्यक्रम महिलांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. कार्यक्रमात डॉ. आयुश्री आशिष देशमुख आपले मनोगत व्यक्त करताना महिलांच्या अनेक समस्या असतात आणि त्यावर उपाययोजना कराव्या, याबद्दल मार्गदर्शन केले. संपूर्ण सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्र कॅन्सर मुक्त करण्यासाठी गावागावात डॉक्टरांची टीम तपासणी करणार असे सांगितले. मकरसंक्रांतचे महत्त्व आणि सावनेर-कळमेश्वर क्षेत्राला विकासकामात मागे पडू न देता सतत विकासकार्य करू अशी ग्वाही दिली.

समर्पण फाउंडेशनचे PACK YOUR PLASTIC या प्लास्टिक कचराविषयी सुरू असलेल्या पर्यावरणपूरक अभियानाची एक चित्रफीतदेखील या वेळेस देशमुख यांच्या उपस्थितीत प्रथमच प्रदर्शित करण्यात आली. त्यांनी या अभियानच कौतुक करीत नागरिकांना प्लास्टिक कचऱ्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल माहिती देताना प्लास्टिकचा उपयोग कमी करण्याबद्दल आव्हान केले. कार्यक्रमात वित्तेश्वर संचालक मंडळाच्या डॉ. गौरी मानकर, सोनाली उमाटे, भावना बागडे, निशा नारेकर, डॉ. मोनाली पोटोडे, अनुराधा नवधिंगे, प्रियंका मुलमुले, अनुष्का गहरवार, डॉ.वैशाली दाते, उज्ज्वला चित्तेवान, तेजस्विनी लाड उपस्थितीत होत्या.

## वृद्ध नागरिकांसाठी कोराडीत विविध स्पर्धांचे आयोजन

**वार्ताहर/कोराडी**

कोराडी कामगार मनोरंजन केंद्र, क्रमांक दोनतर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त रविवारी सकाळी अकरा ते सहा वाजेपर्यंत सीनियर सिटीजन यांच्या आंतरगृह स्पर्धा व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन कामगार मनोरंजन क्लब क्रमांक दोन कोराडी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शबनम अंसारी होत्या. तर प्रमुख पाहुणे रेखा डांगोरे, सुनंदा भांडारकर, शालिनी भोयर, शांता बारसांगडे, रंजनी यादव उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन कामगार मनोरंजन क्लब क्रमांक २ चे अध्यक्ष सेवकराम बांगडे आभार गोपाल राठोड यांनी केले. डी. एस. सोनारे, सुमित मुसळे यांनी उपस्थिती यांना मार्गदर्शन केले. साठ वर्षे पूर्ण केलेले आजी आजोबा साठी आगळी-वेगळी मेजवानी केली होती. त्यात विविध खेळाचेसुद्धा आयोजन करण्यात आले होते. त्या खेळामध्ये आजी-आजोबांनी मनसोक्त आनंद घेतला. लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

## बाबदेव येथे आज महिला मेळावा व हळदी कुंकू समारंभ

**वार्ताहर/कोदामेंढी**

तारसा-बाबदेव जिल्हा परिषद अंतर्गत येत असलेल्या बाबदेव येथील सामुदायिक भवन येथे मंगळवार, २१ जानेवारी रोजी दुपारी बारा वाजता बाबदेव, सावरगाव, मांगली, नानादेवी, किरणापूर, रहाडी, डहाडी येथील सर्व महिला मंडळींसाठी महिला मेळावा व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक माजी जि.प. सदस्य भारती देवेंद्र गोडबोले यांनी सोशल मीडियामध्ये स्टेटसवर पोस्टर ठेवून केले आहे.

# वर्षभरातच खात-पांजरा मार्ग गेला खड्ड्यात

### गावकरी व शालेय विद्यार्थ्यांचे हाल सुरूच : अधिकारी व ठेकेदार लक्ष देईना

**वार्ताहर/मौदा**

मौदा तालुक्यातील दहेगाव, खात, पांजरा, निहारवाणी या मुख्य भागातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. वास्तविक पाहता काही वर्षांपूर्वीच या रस्ता कामाला मुंजरी का मिळाली. मात्र, अद्यापही कामाला मुहूर्तच लागला नाही. यामुळे गावकऱ्यांच्या नशिबी अजूनही भोग सुरूच आहे. तालुक्यातील खात- पांजरा-निहारवाणी या मागाची दुरवस्था झाली असून, या मार्गाने ये-जा करणारे वाहन चालक व शालेय विद्यार्थी अक्षशः त्रस्त झाले आहेत. आजघडीला हा मार्ग वाहन धारकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी जीवघेणा ठरत आहे.

खात येथून जाणारा हा मुख्य मार्ग पांजरा निहारवाणी पुढे नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्ग ५३ ला जोडल्या गेला असून, या मार्गाने गावकरी, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. परंतु मार्गावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून गिट्टी उखडलेली असल्याने मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रात्री खड्डे चुकविण्याच्या नादात वाहनधारकांचे अपघातसुद्धा झाले आहे. या मार्गाने वाहने चालविताना चालकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागते. अशा दयनीय मार्गाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत आहे. निवडणुका जाहीर झाल्या की



विविध राजकीय पक्षाचे नेते व लोकप्रतिनिधी गावांमध्ये दाखल होत घरोघरी भेट देत आश्वासनांची खैरात वाटत मतांचा जोगवा मागत असतात. मात्र निवडणुका झाल्या की मार्ग समस्या असो किंवा इतर समस्या सर्वांचा विसर पडतो. संबंधित विभाग अधिकारी व लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष द्यावे, शासनाने निधीची तरतूद करून नवीन मार्ग बांधकाम करावे, अशी मागणी खात-पांजरा व निहारवानी यासह छोट्या गावातील नागरिकांनी केली आहे.

**साहेब, आम्ही शाळेत जायचे कसे ?**

पांजरा येथील विद्यार्थी खात व भंडारा येथील शाळा महाविद्यालयामध्ये शिकायला जातात. पांजरा येथून खातपर्यंत विद्यार्थ्यांना सायकलने किंवा पायी चालत यावे लागते. रस्त्यावरील गिट्टी उघडल्यामुळे येणाऱ्या चार चाकी वाहनामुळे रस्त्यावर उखडलेली गिट्टी उडून कधी लागेल याचा नेम नाही. अनेकदा येथील शालेय विद्यार्थ्यांना ये-जा करत असताना चार चाकी वाहनाने उडलेली गिट्टी लागून किरकोळ जखमी झाले आहे. विद्यार्थ्यांना या मार्गाने मार्गक्रमण करताना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्षभराआधीच केली होती मार्गाची मलमपट्टी : मागील वर्षातच या मार्गाची खड्डे बुजवण्याकरिता मलमपट्टी करण्यात आली होती. शासन मार्गाच्या डागडुजीकरिता करोडो रुपये खर्च करते, परंतु संबंधित विभाग अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने मार्गाची डागडुजी ही थातूरमातूर व निकृष्ट दर्जाची करण्यात आली होती. अशावेळी महिने दोन महिने होत नाहीत तर त्याच मार्गाची अवस्था पुन्हा जैसे थे झाली.

जड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक : हा रस्ता आधीच खराब झाला आहे त्यातच मागील काही दिवसांपासून त्यावरून रेती व मुरम भरलेल्या ट्रकची वाहतूक मोठ्या प्रमाणात रोज केली जात आहे. ही वाहने वेगात जात असल्याने त्यांच्या वेगामुळे रोडवरील गिट्टी उडत असते.

## अटल भूजल योजनेंतर्गत ग्रा.पं. सिंदी येथे उपविभागीय अधिकाऱ्यांची भेट



**वार्ताहर/सावरगाव**

काटोलचे उपविभागीय अधिकारी पीयूष चिवंडे यांनी नरखेड तालुक्यातील ग्रामपंचायत सिंदी (उमरी) येथे भेट देऊन अटल भूजल योजनेमधून प्रोत्साहन निधी अंतर्गत झालेल्या कामांमध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नागपूर यांच्याद्वारे केलेल्या रिचार्ज शाफ्ट, मृद व जलसंधारण विभागाद्वारे केलेल्या नाला खोलीकरण, कृषी विभागाद्वारे केलेल्या साठवण बंधारे इत्यादी कामांची पाहणी केली.

तसेच अटल भूजल योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर बसविण्यात आलेले पर्जन्यमापाक यंत्र व फिझोमिटर, भूजल माहिती आणि प्रसारण केंद्र यांची पाहणी केली. तसेच गावच्या जलसुरक्षा आराखड्याची माहिती घेऊन पुढील कामकाजासाठी मार्गदर्शन केले.

यावेळी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्र नागपूर, डॉ. वर्षा पी. माने, सहाय्यक भूवैज्ञानिक डॉ.नंदकिशोर बोरकर, डॉ. प्रशांत शहारे, क्षमता बांधणी, माहिती,शिक्षण आणि संवादतज्ज्ञ नीलेश खंडारे, कृषितज्ञ प्रतीक हेडाऊ, सिंदी(उमरी) च्या सरपंच प्रगती सावध, ग्रा.पं. अधिकारी संध्या राजनकर, सदस्य हिम्मत नखाते, नारायण इंगोले, सद्भावना ग्रामीण विकास संस्था वर्धा जिल्हा अंमलबजावणी भागीदार येथील समन्वयक ममता बालपांडे, क्षमता बांधणी माहिती, शिक्षण आणि संवादतज्ज्ञ सतीशकुमार हेलोंडे, कृषितज्ञ सहाय्यक विवेक मुंदाफळे, जलसंधारणतज्ज्ञ मयूर दुहीजोड, अभिषेक मेश्राम, भूवैज्ञानिक डॉ. हेमंत सोनकुसरे, समुदाय संघटक महेश बेलखेडे तसेच गावातील पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्राहिताच्या कार्यात समर्पित व्हा - योगीराज बल्की महाराज

### आकर्षक दीपयज्ञाने नागरिकांना घातली भुरळ

**वार्ताहर / वाडी**

कलश यात्रेने सुरू झालेल्या श्रीमद पावन प्रज्ञापुराण कथेचा शुक्रवारी, भव्य महाप्रसादाने समारोप झाला. आपल्या प्रवचनाला वैज्ञानिक दृष्टिकोनाची सांगड घालीत निरोगी व शक्तिशाली शरीर बनविण्यासाठी प्रबोधन करीत राष्ट्रप्रेमाच्या धाग्यात गुंफन्याचे आवाहन बल्की महाराजांनी उपस्थित तरुण व महिला पुरुषांना केले. ध्यान साधनेला जीवनात कशाप्रकारे अनन्य महत्त्व आहे. हे अनेक पुराव्या सहित पटवून देतांना स्वतःला राष्ट्राहिताच्या कार्यात समर्पित व्हावे यासाठी ते साद घालीत होते. सकाळच्या प्रहरी ध्यान साधना, २४ कुंडीय हवन व दुपारच्या सत्रात पावन प्रज्ञा पुराण कथेला हजारो भाविकांनी हजेरी लावली. यात शनिवारी दीप महायज्ञात गायत्री महिला परिवाराने एक लक्ष मातीच्या दिव्यांची केलेली रोमहर्षक सजावट व दीपजोत्यांचा मनमोहक लख्ख झगमगाट हजारो



उपस्थित्यांचे लक्ष वेधत होते. रविवारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

पाच हजारांहून अधिक भाविकांनी याचा लाभ घेतला. कार्यक्रमाला आ. समीर मेघे, हर्षल काकडे, नरेश चरडे, राजेश थोराने सहित अनेक समाजसेवकांनी हजेरी लावली. खिल विश्व गायत्री परिवार शांती कुंज हरिद्वार यांच्या मार्गदर्शनात शांती कुंज हरिद्वार टोळीद्वारे श्री गायत्री प्रज्ञा महिला मंडळ वाडी परिसर दत्तवाडी नागपूर आयोजित या कार्यक्रमाला मोलाचे मार्गदर्शन गायत्री परिवाराचे वरिष्ठ कार्यकर्ते दीपक बिडवई व युवा कार्यकर्ते बंडू मेश्राम यांचे मिळाले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाडी मंडळाच्या संयोजिका निर्मला राऊत, गणेश सालोडे, मधू माणके पाटील, कविता सालोडे, नलिनी कोंगे, कुसूम उताणे, सुरेखा रिंके, कुसूम भोयर, वैशाली कापगते, संगीता वऱ्हाटे, शोभा समर्थ, सुनंदा सोहलिया आदींनी परिश्रम घेतले.

## वाडीत महाराणा प्रताप पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**वार्ताहर/वाडी**

वीर महाराणा प्रताप पुण्यतिथीनिमित्त रविवारी दत्तवाडी स्थित वसंत विहार परिसरातील वीर महाराणा प्रताप स्मारकावर भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.

वसंत विहार स्थित सार्वजनिक मैदानात निर्मित वीर महाराणा प्रताप स्मारकातिल प्रतिमेवर बी.एन. सिंह व अखिलेश सिंह याच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. उपस्थितांनीदेखील पुष्प अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण केले. यावेळी उपस्थित श्री राजपूत करणी सेवा ग्रामीण नागपूर जिला अध्यक्ष अखिलेश सिंह, हिंगणा विधानसभा अध्यक्ष सुष्मित सिंह राजपूत, वाडी अध्यक्ष मुकेश सिंह, उत्तर भारतीय सभा अध्यक्ष प्रवीण सिंहसह वीरेंद्रनाथ सिंह, दुर्गा माता मंदिर समितीचे अध्यक्ष जगदेव सिंह राणा, मदनसिंह राणा, टीपी पांडे, अमरेंद्र सिंह, आनंद प्रताप सिंह, लालाभाई, वीरेंद्रसिंह वैश, राजेंद्रसिंह खरवार, शत्रुघ्न सिंह परिहार, बबलू मिश्रा, सुनील मिश्रा, चित्ररंजन झा, संतोष दुबे, मुकेश सिंह यांनी महाराणा प्रतापांचा जयघोष केला.

## कुंटनखान्यावर पोलिसांची धाड; पीडितेची केली सुटका

### दोन आरोपींना अटक, ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वार्ताहर/कन्हान**

कन्हान पोलिस स्टेशन हद्दीत नागपूर-जबलपुर राष्ट्रीय महामार्गावरील रेनबो लॉजच्या आड सुरू असलेल्या कुंटनखान्यावर कन्हान पोलिसांनी धाड टाकली. यात बाहेर जिल्ह्यातून कन्हान येथे बोलावून देहव्यापार करण्यास प्रवृत्त केलेल्या पीडितेची सुटका करून दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार रविवारी (दि. १९) सायंकाळी पोलिसांना माहिती मिळाली की कन्हान-मनसर रोडवरील रेनबो लॉजमध्ये लॉजमालक मनोहर चिरकुट हुड हे आपल्या लॉजवर लोकांकडून पैसे घेऊन अवैधरित्या कुंटनखाना चालवित आहे. या माहितीवरून कन्हान पोलिसांनी खबऱ्याला रेनबो लॉजमध्ये पाठवून शहानिशा केली. खबऱ्याने फोनवर मिस



कॉल केल्याने पोलिसांनी धाड टाकली. रेनबो लॉज येथे दिल्ली येथून तरुणीला बोलावून व अधिक पैशाचे आमिष दाखवून तिला देहव्यापार करण्यासाठी प्रवृत्त केले.

ग्राहकांना लॉजमध्ये ग्राहकांना तरुणी उपलब्ध करून देऊन कुंटनखाना चालविल्या जात असल्याचे पोलिसांना चौकशीत दिसून आले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मनोहर चिरकुट हुड (वय ४७) रा. टेकाडी, वेदांत राजेंद्र लंगडे (वय १९) रा.वराडा यांना अटक करून त्यांच्याजवळून ५१,८२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कन्हान पोलिसांनी पीडितेची सुटका करून दोन आरोपींविरुद्ध कलम ३,५ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष गायकवाड, पोलिस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक राहुल चव्हाण, रोशन बावनकर, हरीश सोनभद्रे, महेश बिसेन, अमोल नागरे, अश्विन गजभिये, सुशील तेलंग, मोहित झाडे, सतीश तलेवार, महिला कर्मचारी वीणा थूल, स्वाती चव्हानसह आदी पोलिस कर्मचाऱ्यांनी ही कारवाई पार पाडली .

## राम गणेश गडकरी महाविद्यालयात वाचन पंधरवाडा संपन्न

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा

**तालुका वार्ताहर/सावनेर**

'वाचाल तर वाचाल' हा अमूल्य विचार आपल्या सर्वांसाठीच अतिशय मोलाचा आहे. ज्ञान आणि वाचन यांचे नाते जवळचे आहे. म्हणूनच वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध असणे गरजेचे आहे असे मत वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत आयोजित वाचन पंधरवडा कार्यक्रमात नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव टेकाडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.

स्थानिक राम गणेश गडकरी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राच्या या उपक्रमांतर्गत वाचन पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. शोभा ताजने यांनी सांस्कृतिक मूल्य जोपासण्यासाठी वाचनाकडे सर्वांनी लक्ष केंद्रित केले



पाहिजे, असे विचार व्यक्त केले. महाविद्यालयात वाचन पंधरवाडा अंतर्गत पुस्तक परीक्षण कथन स्पर्धा ग्रंथ प्रदर्शन वाचन कौशल्य वाचन संवाद सामूहिक वाचन इत्यादी विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. मीना फुले प्रा. गोपाल वाडेकर प्रा. ममता सावजी यांनी मार्गदर्शन केले. संचालन प्रा. कांतेश्वर बोरीकर, प्रास्ताविक ग्रंथपाल अश्विनी चिमणकर तर प्रा. नीता ठाकरे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्रा. अर्चना देशमुख, प्रा. ठाकरे, प्रा. दशरथ बोबडे, प्रा. कवडू बावणे, प्रा. गायकवाड, प्रा.कपिल खुबाळकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी विजय फलके गोपाल मोंढे, प्रकाश करांगळे यांनी सहकार्य केले.

## सावनेर येथे आ. डॉ. आशिष देशमुख यांचा जनता दरबार

### सावनेरच्या विकासासाठी आणि समस्या निवारणासाठी कटिबद्ध

**तालुका वार्ताहर/सावनेर**

आ. डॉ. आशिष देशमुख यांनी १७ जानेवारीला नगर परिषद सावनेर येथे जनता दरबार व आढावा बैठकीचे आयोजन केले होते. यामध्ये विविध शासकीय विभागातील सर्व अधिकारी उपस्थित होते. स्थानिक व तालुक्यातील लोकांच्या समस्या लेखी स्वरूपात घेण्यात आल्या. त्यांनतर प्रत्येक समस्या वाचून संबंधित अधिकाऱ्यांना तक्रारीचे निवारण करण्याचे आदेश आ. डॉ. आशिष देशमुख यांनी दिले.

यावेळी बोलताना त्यांनी अनेक समस्यांवर उपाययोजना सांगितल्या. गुंठेवारी प्रकरणे निकाली काढणे, अवैध धंद्यांवर आळा घालणे, कॅन्सर निदान व उपचार मोहीम राबविणे, गुन्हेगारी नियंत्रणासाठी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, पाण्याची समस्या सोडवणे,




सार्वजनिक वाचनालय, व्यायाम शाळा, बगीचे अशा अनेक विषयांवर त्यांनी मार्गदर्शन करून उपयुक्त आदेश संबंधितांना दिले. कोर्टाच्या इमारत बांधकामाकरिता ४४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. चांगली पिढी घडविण्याकरिता वाचनालयामध्ये चांगली पुस्तके उपलब्ध करून देणार आहे. व्यायाम शाळेसाठी अत्यावश्यक साहित्य उपलब्ध करून देणार आहे तसेच चांगल्या बगीच्यांची निर्मिती करणार आहे, असेही ते यावेळी म्हणाले. गुंठेवारी प्रकरणे निकाली काढत नसल्याच्या तक्रारी, छोट्या भाजीपाला व्यावसायिकांना मागे तर मोठ्यांना पुढे जागा दिल्याच्या तक्रारी, शहरात वाढत असलेले अतिक्रमण, पालिकेला लिजधारक किंवा टॅक्स देणाऱ्या व्यापाऱ्याजवळून पालिकेद्वारे बळजबरीने बाजार चिट्ठी घेत असल्याच्या तक्रारी, नालीतून सांडपाणी वाहून न जाणे, पुतळे व बगिचे स्वच्छ न होता त्याचे बिल लाखात काढणे, प्रशस्त वाचनालय व व्यायाम शाळेची मागणी, अवरुद्ध रस्ते, नाली सफाई न होणे, सायंकाळी झाडण्यात न येणे, अर्धवट राहिलेले चिकन मार्केट हटविणे, जुना धन्यगंज येथे बगीचा निर्माण करणे अशा अनेक विषयांवर तक्रारी व निवेदन यावेळी चर्चिल्या गेले.

एकूणच अनेक समस्या नागरिकांनी आ. डॉ. आशिष देशमुख यांच्यासमोर मांडल्या. यावर त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना या समस्यांवर तोडगा काढण्यासंबंधी सूचना दिल्या. आजपर्यंत झाालेल्या जनता दरबारापैकी हा पहिला जनता दरबार होता जो पूर्णवेळ, शेवटपर्यंत चालला.

यावेळी सावनेर पालिका मुख्य अधिकारी बगडे, माजी न.प. अध्यक्ष ॲड. अरविंद लोधी, सावनेर उपविभागिय अधिकारी संपत खलाटे, डॉ. विजय धोटे, ॲड. प्रकाश टेकाडे, अशोक धोटे, रामराव मोवाडे, मंदार मंगळे, राजु घुगल, तुषार उमाटे, सुजित बागडे, दिवाकर नारेकर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

## एकाच दिवशी पाच दुकानात चोरी

**वार्ताहर/खापा**

पोलिस स्टेशनच्या अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या नवीन वस्ती येथील स्थित पाच दुकानांत चोरी झाल्याची घटना सोमवार, २० जानेवारी रोजी सकाळी उघडकीस आली.



मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी सर्व व्यावसायिक आपले दुकाने सुरू करण्याकरिता आले असता, त्यांना त्यांच्या दुकानाचे ताळे तुटलेले दिसले. पोलिस स्टेशनच्या अगदी जवळ असलेल्या जागेश्वर गायधनी, प्रभाकर भुते, रोशन कोल्हे, सदशिव धार्मिक, आशिष खुबाळकर यांच्या दुकानात चोरी झाल्याचे आढळून आले. पोलिस स्टेशन अगदी जवळ असून चोरांना पोलिसांची भीती नाही, असे निदर्शनास येत आहे. तसेच जुनी वस्ती माळीपुरा येथील जनार्दन खंडाळे, श्रीमती कडू यांच्या घरी चोरी. तसेच १ ते १९ जानेवारीदरम्यान भागाबाई केकतपुरे, लक्ष्मीबाई धांदे, जनार्दन खंडाळे, उफाट गुरुजी यांच्याकडेही चोरीची घटना घडली. एकीकडे पोलिस हे अवैध रेती उत्खनन, अवैध गो तस्करी, अवैध दारू वाहतूक, अवैध सागवान वाहतून यावर टपून बसलेले आहेत. पण, यातही अशाप्रकारे चोरी होणे ही, चिंतेची बाब आहे. त्यामुळे पोलिसांबाबत नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

# समर्थ कुटुंब व्यवस्थेची सुरुवात ग्रामायणच्या प्रयत्नातील पहिले पाऊल ठरेल

## कुटुंब प्रबोधन अ. भा. प्रमुख रवींद्र जोशी यांचे प्रतिपादन



**लोकशाही वार्ता/नागपूर**

बल, शील, पूजा, धैर्य, युक्ती, बुद्धी, दृष्टी आणि दक्षता या आठ गुणांची जोपासना प्रत्येकाने आपल्या घरात केली पाहिजे. या गुणांसोबतच दुर्गुणांचा त्याग करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भय, स्वार्थ, अहंकार, आळस, चुकीच्या सामाजिक मान्यता, आणि बौद्धिक जडता. हे दुर्गुण जर आपण आपल्या घरातून दूर केले, तर आपले कुटुंब खऱ्या अर्थाने समर्थ कुटुंब बनेल. समर्थ कुटुंब व्यवस्थेची सुरुवात हे ग्रामायणाच्या या प्रक्रियेत पहिले पाऊल ठरेल, असे प्रतिपादन कुटुंब प्रबोधन गतिविधी, रा.स्व. संघाचे अ.भा प्रमुख रवींद्र जोशी यांनी केले.

अमृत भवन, आंध्र असोसिएशन परिसर, उत्तर अंबाझरी मार्ग, झांशी राणी चौकाजवळ, नागपूर येथे आयोजित ग्रामायण प्रतिष्ठानच्या ६व्या ग्रामायण उद्यम प्रदर्शनाचा समारोप सोमवारी (२० जानेवारी) पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी, प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ता व कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे अध्यक्ष बी.सी. भरतिया, राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता बिश्वास, ग्रामायणचे अध्यक्ष अनिल सांबरे, सचिव संजय सराफ, उपाध्यक्ष डॉ. चंद्रकांत रागीट यांची उपस्थिती होती. पुढे ते म्हणाले, भारताकडून नवीन प्रकाश मिळेल, जीवनातील अंधकार दूर होईल, आणि सगळ्यांचे जीवन सुखी, संपन्न व सार्थक बनेल, अशी आशा जग बाळगून आहे. या जीवनमूल्यांना रुजवण्यासाठी आणि या उपक्रमाला ग्रामीण भागातून पाठबळ मिळावे, अशी प्रेरणा समाजाला आपण द्यायला हवी. आपल्या सर्वांना या कार्यासाठी एकत्र येऊन प्रेरणा घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आम्ही प्रॉडक्टच्या विक्रीपासून ते गुणवत्ता आणि ब्रॅडिंगपर्यंत लक्ष केंद्रित करीत आहोत. प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंटच्या माध्यमातून पर्यावरणपूरक उपक्रम राबवणे ही एक उल्लेखनीय गोष्ट असल्याचे राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता बिश्वास यांनी केले. देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था सध्या शहरातील उपभोक्तावादी दृष्टिकोनावर अवलंबून आहे. परंतु, चुकीच्या दृष्टिकोनामुळे अर्थव्यवस्था खालावत नाही ना, याचा विचार करणे गरजेचे असल्याचे बी.सी. भरतिया यांनी सांगितले. सोहळ्यात अर्धशतकाहून अधिक काळ सहजीवनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या ३५ दाम्पत्यांचा सुवर्ण महोत्सवी प्रभाकर शंकरराव देशमुख, मकरंद राजाभाऊ कुलकर्णी, पुरुषोत्तम हरिभाऊजी कावळे, प्रकाश वाघमारे, श्रेयस राजू भावे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उमा गंगाधर पिंपळकर आणि चंद्रकांत यांना ग्रामायण ज्येष्ठ समाजयोद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संचालन नरेंद्र गिरीधर यांनी तर प्रशांत बुजोणे यांनी आभार मानले.

# ग्रामीण विकासाला नवी दिशा देण्याचे सामर्थ्य पशुवैद्यकीय शास्त्रात

## पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांचे प्रतिपादन

**लोकशाही वार्ता / नागपूर**

पूर्वापार चालत आलेल्या परंपरा व ज्ञानाच्या आधारावर शेतीला पशुधनाची जोड देत यातून अतिरिक्त उत्पादकता आपल्या पूर्वजांनी घेऊन दाखविली. या क्षेत्रातील संशोधकांनी कालपरत्वे दिलेल्या योगदानाच्या साहाय्याने प्रगतीचा एक मोठा पल्ला आपण गाठू शकलो. आजच्या घडीला दुधाच्या उत्पादनात आपण जगात प्रथम क्रमांकावर आहोत. अंडी उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. ग्रामीण भागाला विकासाची नवी दिशा देण्याचे सामर्थ्य पशुवैद्यकीय शास्त्रात असल्याचे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) अंतर्गत आयोजित जागतिक पशू आहार शास्त्र परिषदेच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या रजत जयंती सभागृहात आयोजित या समारंभास पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., भारतीय कृषी अनुसंसाधन परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशू पाठक, पशुविज्ञान शाखेचे उपमहासंचालक डॉ. राघवेंद्र भट्ट, कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे व ज्येष्ठ संशोधक उपस्थित होते. पशुधन, वनसंवर्धन, पर्यावरण आणि शाश्वत जीवनशैलीबाबत भारतीय संस्कृतीने आपल्याला एक अमूल्य देणगी दिली आहे. आपल्या ईश्वरांनीही आपले वाहन पशुधनातून घेतले आहे. याचबरोबर पक्ष्यांनाही सन्मान दिला. उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीत वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे दूध, मांस, अंडी उपलब्ध व्हावेत, यातील पोषण मुलद्रव्य वाढण्यासह पर्यावरणातील संतुलनही राखले जावे, यादृष्टीने आयोजित जागतिक पशू आहार शास्त्र परिषद महत्त्वाची आहे. या निमित्ताने आपण सर्व संशोधक एकत्र येऊन या क्षेत्राला नवी दिशा द्याल याची खात्री असल्याचे मुंडे यांनी सांगितले. प्रास्तातवक डॉ. नितीन पाटील यांनी केले. या समारंभात ज्येष्ठ शास्त्रज्ञांचा गौरव करण्यात आला.



### विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधेसाठी सर्व सिद्ध होऊया

**मत्स्योत्पादन क्षेत्रातही आज अनेक संशोधने झाली आहेत. जनावरांच्या चाऱ्याच्या व्यवस्थापनापासून ते मत्स्य बीजोत्पादन, त्यांचे वजन, त्यांना अधिक पौष्टिक करणे यासह जलव्यवस्थापन असे अनेक क्षेत्र संशोधकांसाठी खुले आहेत. दुधाच्या गुणवत्तेपासून गरजेनुरूप उपलब्धतेपर्यंत अनेक क्षेत्रात संशोधक योगदान देत आहेत. या क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्यासह चांगल्या बदलासाठी आपण सर्व सिद्ध होऊया, असे त्या म्हणाल्या.**

**ग्रामीण भागाला सावरणाऱ्या शेतीपूरक पशू-पक्षी पालन, मत्स्यव्यवसाय उद्योगाला भविष्यात जर अधिक शाश्वत करायचे असेल तर हवामान बदलाचा विचार करून प्राण्यांच्या पोषक अन्नद्रव्याचे काटेकोर नियोजन करणे नितांत आवश्यक आहे. याचबरोबर ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना अन्न सुरक्षिततेसह शेतीपूरक उद्योग व्यवसायातून चांगल्या उत्पन्नाची संसाधने अधिक भक्कम करण्यासाठी संशोधकांनी पुढे यावे, असे आवाहन मुंडे यांनी केले.**







प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा कस्तुरचंद पार्कवर होणार आहे. याची तयारी प्रशासनातर्फे सुरू आहे. तर पोलिस प्रशासनातर्फेदेखील प्रजासत्ताक दिनाच्या परेडची पूर्वतयारी सुरू आहे. दररोज येथे अशाप्रकारे रंगीत तालीम सुरू आहे. (लोकशाही वार्ता छायाचित्रसेवा)

# आयएमएमध्ये 'सुखांत' नाटकाचा प्रयोग

**लोकशाही वार्ता / नागपूर**

इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) नागपूर शाखेच्या नाट्य समितीच्यावतीने जे.आर.शॉ. ऑडिटोरियम येथे रत्नाकर मतकरी लिखित 'सुखांत' या मराठी नाटकाचा यशस्वी प्रयोग पार पडला. या नाटकाचे दिग्दर्शन रमेश लखमापुरे यांनी केले आणि सहभागी कलावंतांनी अत्यंत व्यावसायिक पद्धतीने या नाटकाचे सादरीकरण केले.



समितीच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्राची महाजन यांच्यासह आयएमए अध्यक्षा डॉ. मंजूषा गिरी, सचिव डॉ. प्राजक्ता कडूसकर यांचा समावेश होता.

नाटकातील प्रतिभावान कलावंतांमध्ये डॉ. आशिष थूल, डॉ. प्राची महाजन, डॉ. स्नेहल जोशी, डॉ. अभय आगाशे, डॉ. स्नेहल जिभकाटे डॉ. मंगेश मुळावकर आणि डॉ. मंजूषा गिरी यांचा समावेश होता. या यशस्वी नाट्य प्रयोगाचा आस्वाद आयएमएचे सदस्य आदींनी घेतला.

# समाजात सभोवताल जे पाहतो, जे जगतो तेच लिखाणात यायला पाहिजे!

## रवींद्र जवादे यांचे प्रतिपादन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

आज समाजात जे पाहतो, जे जगतो ते लिखाणात यायला पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक रवींद्र जवादे यांनी केले. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर नागपूर येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त वात्सल्य मराठी साहित्य समूह नागपूरद्वारा आयोजित 'युवा मराठी कवीसंमेलनाचे' आयोजन पार पडले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रिन्सिपल करसपॉन्डट महाराष्ट्र टाइम्स नागपूर मंदार मोरोणे, ज्येष्ठ कवयित्री मिनल येवले व सुप्रसिद्ध कादंबरीकार विशाल देवतळे उपस्थित होते. युवकांनी सकारात्मक भावनेतून जीवनोत्सव करावा, असे भावोद्‌गार कवीसंमेलनाच्या प्रमुख अतिथी मंदार मोरोणे यांनी व्यक्त केले. तसेच आपल्या राज्याच्या जीर्ण होत चाललेल्या लोकशाहीस सजग करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यायला पाहिजे, भाव विशाल देवतळे सुप्रसिद्ध कादंबरीकार यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले.



युवा दिनाच्या निमित्ताने आयोजित कविसंमेलनात एकापेक्षा एक अशा दर्जेदार कविता सादर झाल्या. जवळजवळ २८ कवींना या कवी संमेलनाकरिता निमंत्रित करण्यात आले होते. ज्यात नागपूरमधील सुप्रसिद्ध कवी नरेंद्र माहूरतळे, प्रकाश कांबळे, धनश्री पाटील, अर्चना मानकर पिसे, रजनी संबोधी, भगवंत शोभणे, विजय बेले,अरुणा भोंडे, राजेश कुबडे, राजू डाहाके, संजय गोडघाटे, दिप्ती हटवार, वैशाली देशमुख, वैशाली वरघणे, रेखा सोनारे नवोदित कवी तुषार लाखे, रुपाली निखारे, इत्यादी कवींनी आपल्या बहारदार अशा रचना सादर केल्या. वात्सल्य कवी संमेलनाचे यशस्वी सूत्रसंचालन सुप्रसिद्ध कवयित्री निवेदिका धनश्री पाटील नागपूर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार नरेंद्र माहुरतळे यांनी मानले. कवी संमेलनासाठी वात्सल्य मराठी साहित्य समूह नागपूरचे सर्व सहसंयोजकांनी सहकार्य केले.

# मानवता जपत त्या 'कबुतराला' मिळाले जीवनदान

## ५० फुटांवर मांजात पडला होता अडकून

**लोकशाही वार्ता/नागपूर**

मकरसंक्रांतीचा सणाला सहा दिवस लोटले असले तरी आकाशात पतंगबाजीचा पेच अजूनही सुरू आहे. यातूनच एका पिंपळाच्या झाडावरील मांजात अडकून पडलेल्या कबुतराचा जीवनसंघर्ष सुरू होता. त्याने झटापट केलीही .परंतु, तो यातून बाहेर पडू शकला नाही. अगदी झाडाच्या ५० फुटांवर कबुतराची ही धडपड एका नागरिकाला दिसली. त्यांनी मानवता जपत अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या सहाकार्याने कबुतराची सुटका केली.

मकरसंक्रांतीचा सणात यंदाही मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजाचा वापर झाला. सुदैवाने कुठीही जीवितहानी झाली नसली तरी मांजामुळे अनेकजण गंभीर जखमी झाले. अशातच अहिल्यादेवी होळकर कॉलनी धनगर मोहल्ला गणेश गौरी अपार्टमेंटजवळ आकाशात स्वच्छंद घिरट्या घालणारा कबुतर पिंपळाच्या झाडावर थोडा विसावला खरा; परंतु, झाडावरील मांजात अडकून पडला. त्याने सुटकेसाठी धडपड केलीही मात्र, तो मांजात आणखी गुंतून पडला. याच परिसरात राहणारे सुशील ढवळे आणि त्यांच्या मित्राची नजर उंच अशा या पिंपळ्याच्या झाडावर पडली. त्यांना कबुतराची ही अवस्था बघवली गेली नाही. त्यांनी आपापल्यापरीने कबुतराची सुटका करण्याचा प्रयत्न केला. मात्र, यश आले नाही. कबुतराच्या पंखात मांजाची चांगलीच गुंतागुंत झाली होती. परिणामी, त्यांनी अग्निशमन विभागाला माहिती दिली. विभागाच्या नरेंद्रनगर फायरस्थानकातून पाच ते सहा कर्मचारी अग्निशमन बंबासह येथे पोहोचले आणि कबुतराचे 'रेस्क्यू ऑपरेशन' सुरू झाले.

### दीड तासानंतर सुटका

**जमिनीपासून कबुतर जवळपास झाडच्या ५० फुटांवर अडकला होता. झाडाच्या जवळच असलेल्या इमारतीवरून हे अंतर ३० फूट होते. इमारतीवर चढून दोन वेळू (बांबू) एकत्र बांधले. त्याला विळा लावला. कबुतराजवळील मांजा दूर सावरला. जवळपास दीड तासांच्या प्रयत्नानंतर कबुतराची मांजातून सुटका झाली आणि पुन्हा तो स्वच्छंद आकाशात भरारी घेत निघून गेला.**

# अभाविपच्या ५३ व्या विदर्भ प्रांत अधिवेशनाचे भूमिपूजन संपन्न

**नागपूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रदेशचे ५३ वे प्रदेश अधिवेशन येत्या २८ ते ३० जानेवारीदरम्यान रेशीमबागेतील स्मृती मंदिर परिसर येथे होत आहे. या अधिवेशनाचे भूमिपूजन समारोह सोमवार, २० जानेवारी रोजी प्रसिद्ध उद्योजक आशिष फडणवीस व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.राजेंद्र काकडे यांच्या हस्ते पार पडले. या समारोहाला माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर, अभाविपचे विदर्भ प्रांत संघटन मंत्री विक्रमजीत कलाने, नागपूर महानगर अध्यक्ष डॉ. अभय मुदगल, महानगर मंत्री दुर्गा भोयर, नागपूर महापालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष विरेंद्र कुकरेजा यांची उपस्थिती होती. हे अधिवेशन विदर्भ प्रदेशाच्या युवा तरूणाईला नवी ऊर्जा व दिशा देणारे ठरणार असून विदर्भातील १२० तालुके व ११९ मोठ्या सेंटरमधील ५५० महाविद्यालयातून २००० विद्यार्थी प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत.

# कृषी प्रधान नव्हे, उद्योग प्रधान देश

## डॉ. मनमोहन वैद्य यांचे मत

**लोकशाही वार्ता/नागपूर**

पूर्वीपासून आपल्याकडे भारत हा कृषिप्रधान देश असल्याचे म्हणण्यात येते. वास्तविकताः हे पूर्णतः सत्य नाही. पूर्वीच्या काळी आपल्या देशात घरोघरी छोटे उद्योग धंदे, व्यवसाय होते. शेती समृद्ध होतेच, पण समाजातील सर्वच घटक उद्यमी होते. त्यामुळेच आपला देश कृषी प्रधान नव्हे तर उद्योग प्रधान आहे. हा इतिहास आपण मांडला पाहिजे. असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारणी सदस्य डॉ. मनमोहन वैद्य यांनी रविवारी व्यक्त केले.

कॅनरा बँक सेवानिवृत्त एम्प्लॉईज ऑर्गनायझेशनचे चौथे त्रैवार्षिक एक दिवसीय अधिवेशन रेशीमबागेतील डॉ. हेडगेवार स्मृती भवन परिसरातील महर्षी व्यास सभागृहात आयोजित करण्यात आले. अधिवेशनाच्या उद्‌घाटनपर सत्रात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मनमोहन वैद्य बोलत होते. व्यासपीठावर अधिवेशनाचे अध्यक्ष तसेच कॅनरा बँक रिटायर्ड एम्पलॉइज ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल गोयल, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते, वरिष्ठ नागरिक परिसंघाचे राष्ट्रीय महामंत्री वसंतराव पिंपळापुरे, फोरम ऑफ रिटायर्ड बँक एम्प्लॉयीजचे राष्ट्रीय अध्यक्ष व्ही.जी. देसाई, राष्ट्रीय महामंत्री सी.एन.बरगाजे, कॅनरा बँक रिटायर एम्प्लॉयीज ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय महामंत्री आर आर कुळकर्णी यांची उपस्थिती होती. भारत, भारतीयत्व उलगडताना डॉ. मनमोहन वैद्य म्हणाले भारत हा स्वतःची वेगळी ओळख असलेला देश आहे. या देशाने कधीही कुणाला गुलाम बनविले नाही. कुणाचे धर्मांतरण केले नाही. कुणालाही लुटले नाही. सर्व प्रकारच्या उपासना पद्धती स्वीकारत विश्वकल्याणाची प्रार्थना करणारा हा देश आहे. करोणाकाळात जेव्हा इतर देशांमध्ये केवळ सरकारी यंत्रणा कामावर होती, तेव्हा भारतात लाखो लोक रस्त्यावर उतरून एकमेकांना मदतीचा हात देत होते. कॅनरा बँकेतील निवृत्त कर्मचाऱ्यांना योग्य पेन्शन मिळावी. यासाठी वेळप्रसंगी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. व्ही जी देसाई यांनी देखील पेन्शनच्या मुद्यावर प्रकाश टाकला. अधिवेशनाला विनायक इंदुरकर, नागपूर डिव्हिजन कॅनरा बँकेचे व्यवस्थापक जहागीरदार, उदय मनोहर, रवी पोहरकर, सुरेश चौधरी, प्रकाश मनोहर, महेंद्र भिसीकर, प्रवीण बासमतकर, दीपक गाडगे यांच्यासह देशभरातील प्रतिनिधींची उपस्थिती होती. उद्‌घाटनपर सत्राचे प्रास्ताविक अशोक भूताड आणि सूत्रसंचालन अरविंद त्रिपाठी यांनी केले तर अजय जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.



### कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी लढणार

**शून्यातून स्थापन झालेला भारतीय मजदूर संघ आज सत्तर वर्षांचा झाला आहे. या सत्तर वर्षात हे संघटन जगातील पहिल्या क्रमांकाचे कामगार संघटन बनले आहे. राष्ट्र प्रथम मानत चालणारे भारतीय मजूर संघ कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी कायम लढत राहणार, असा निर्धार भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते यांनी यावेळी व्यक्त केला.**

# जिल्ह्यातील १.२२ लाख विद्यार्थी घेणार 'कॉपीमुक्त'ची शपथ

## 'कॉपीमुक्त'साठी जनजागृती सप्ताहास प्रारंभ

**लोकशाही वार्ता / नागपूर**

आगामी फेब्रुवारी मार्च महिन्यात होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा या कॉपीमुक्त व भयमुक्त व्हाव्यात, याकरिता सोमवार, २० जानेवारीपासून राज्यभरात जनजागृती सप्ताहास सुरुवात करण्यात आली आहे. त्यानुसार नागपूर जिल्ह्यातही या सप्ताहाअंतर्गत शिक्षण विभागाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील १.२२ लाखांवर इयत्ता दहावी आणि बारावीतील विद्यार्थी 'कॉपीमुक्त'ची शपथ घेणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील सुमारे ३१ लाखांहून तर नागपूर जिल्ह्यात १.२२ लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षांत सहभागी होणार आहेत. यासाठी जिल्ह्यामध्ये दहावीसाठी २२० वर तर बारावीसाठी १६८ वर परीक्षा केंद्र निश्चित केले आहेत. दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी आता मोठा बदल झाला आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या केंद्रासाठी केंद्र संचालक, पर्यवेक्षक आणि परीक्षेशी संबंधित कर्मचारी हे केंद्राव्यतिरिक्त इतर शाळांमधून नेमले जाणार आहेत. कॉपी रोखण्यासाठी मंडळाने हे नवे धोरण अंमलात आणले आहे. यामुळे परीक्षा केंद्रांवर निष्पक्षता आणि पारदर्शकता वाढणार आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी २० ते २६ जानेवारीपर्यंत जनजागृती सप्ताह राबविण्यात येत आहे. सोमवार, २० जानेवारीला स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक आणि प्राचार्य, शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी करण्याबाबत माहिती देण्यात आली. २१ जानेवारीला कॉपीमुक्त अभियानाची शपथ सर्व शाळांमध्ये परिपाठाच्या वेळी घेण्यात येईल. २२ रोजी शाळा स्तरावर मंडळ शिक्षा सूचीचे वाचन होईल. २३ ला परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञामार्फत शाळांमध्ये पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. २४ ला परीक्षेसाठी अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, उत्तरपत्रिका कशापद्धतीने लिहाव्यात यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल. २५ रोजी कॉपीमुक्त अभियानाच्या जनजागृतीसाठी कॉपीमुक्त घोषवाक्यांचा शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे आणि २६ जानेवारीला ग्रामसभा बैठकीमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक यांनी कॉपीमुक्त अभियानासंदर्भात वरील विषयाबाबत माहिती देणे व याबाबत जनजागृती करणे व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आवाहन करणे असे उपक्रम हे या अभियानात राबविण्यात येणार आहेत.



**१० वी १२ वीच्या परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त व्हाव्यात यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी 'कॉपीमुक्त'अभियानाअंतर्गत जागृती सप्ताह राबविण्यात येत आहे. या सप्ताहात विद्यार्थ्यांना कॉपीमुक्तची शपथ देण्यासोबतच विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.**

**- रोहिणी कुंभार,** माध्यमिक शिक्षणाधिकारी नागपूर